दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.३ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wesnesday 3 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 19 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## आज संपूर्ण महाराष्ट्रासाठी सोन्याचा दिवस भावना व्यक्त करताना जरांगेंना अश्रू अनावर

**मुंबई (वृत्तसंस्था)**
संपूर्ण महाराष्ट्रासाठी विशेषतः मराठवाड्यासाठी आज सोन्याचा दिवस आहे. माझ्या समाजाचे कल्याण झाले. हा माझ्या समाजासाठी सुवर्णक्षण असून आज दिवाळी साजरी करा, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मराठा आरक्षणासाठीचा शासन निर्णय आल्यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. तसेच यावेळी मनोज जरांगे भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांनी आधी मसुदा दिला व त्यानंतर एक तासात जीआर देखील आला. यावेळी मनोज जरांगे यांनी व्यवस्थित पडताळून जीआर वाचले. तसेच वकिलांच्या मार्फत सुद्धा सगळे जीआर व्यवस्थित तपासून घेतले. तसेच मागच्या ७५ वर्षात विजय झाला नसेल असा विजय मराठ्यांचा झाला आहे, असे जरांगे यांनी म्हटले. यावेळी मराठा बांधवांनी 'पाटील.. पाटील' अशा घोषणाबाजी देखील केल्या. मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर मराठा बांधवांनी गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. जरांगे यांनी यावेळी मराठा आंदोलकांना आपापल्या गावी सांभाळून जा, असे निर्देश दिले. मनोज जरांगे यांना आता रुग्णालयात नेण्यात येणार असून ५ दिवसांच्या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खराब झाली असून उपचार सुरू करण्यात येणार आहेत.दरम्यान, मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावरील उपोषण संपल्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने त्यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या आहेत. त्यासंबंधीचे जीआरही सरकारने काढले आहे. त्यामुळे जरांगेंनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून लिंबू सरबत घेऊन आपले उपोषण सोडले. यामुळे गत शुक्रवारपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा तिढा यशस्वीपणे सुटला आहे.



## भूमीपुत्र पुरस्कार विजेते चेतन सौंदळे यांचा वर्गमित्रांकडून सत्कार



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**
महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक लोकमत तर्फे बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभासंपन्न व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांना भूमीपुत्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराने गौरविण्यात आलेले माजी नगरसेवक श्री. चेतन सौंदळे यांचा वैद्यनाथ विद्यालयातील शालेय वर्गमित्रांच्या वतीने सत्कार करण्यात आला. हा पुरस्कार राजस्थान राज्याचे महामहीम राज्यपाल श्री. हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते चेतन सौंदळे यांना प्रदान करण्यात आला होता. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला.

सत्कार समारंभास पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. भारत राठोड, लातूर जीएसटी विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. गौरीहर स्वामी, पालम तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. किशोर धिवार, श्री वक्रेश्वर मंदिर देवस्थानचे विश्वस्त श्री. प्रकाश खोत, ॲड. दत्तात्र्य आंधळे, एकनाथ सावजी, प्रदीप श्रीनिवार, सुशेन दहीफळे, रमाकांत रेवडकर, उपेंद्र धुमाळ, राजकुमार साठे, नरहरी आसेवार, शैलेन्द्र आरविकर आदींसह मोठ्या संख्येने शालेय वर्गमित्र उपस्थित होते.

## डिजिटल मिडिया परिषदेच्या पुणे जिल्हाध्यक्ष पदी भरत निगडे

**पुणे । प्रतिनिधी**
अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या सुचनेनुसार पुणे जिल्हा डिजिटल मिडिया परिषदेच्या अध्यक्षपदी भरत निगडे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. पुणे येथील परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत भरत निगडे यांची नियुक्ती करत पुणे जिल्हा डिजिटल मिडिया परिषदेची कार्यकारणी लवकरच जाहीर करण्याच्या सुचना देण्यात आल्या. मंगळवारी (दि.२) पुणे येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. १४ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन होत आहे. या अधिवेशनाला पुणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकार येण्यासाठी नियोजन करण्यात आले. यावेळी परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, पुणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील लोणकर,संघटक सुनील वाळुंज,पुणे महानगर पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद गव्हाणे, राहुल शिंदे आदी उपस्थित होते.



डिजिटल मिडिया परिषदेचे पहिल्या राज्यव्यापी अधिवेशनासाठी पुणे जिल्हा पत्रकार संघ संलग्न १७ पत्रकार संघातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. डिजिटल मिडियामध्ये काम करणाऱ्या युवकांनीही या अधिवेशनाला उपस्थित राहण्याचे आवाहन एस.एम.देशमुख यांनी केले आहे. पुणे जिल्ह्यांतून १०० हुन अधिक पत्रकार या अधिवेशनाला उपस्थित राहतील असा विश्वास एस.एम.देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

## सण-उत्सवाच्या काळात दंगेखोर आणि गुन्हेगारांना जिल्ह्याबाहेर प्रवेशबंदी

**नंदुरबार । दिपक गोसावी**
गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नंदुरबार जिल्हा पोलिसांनी दंगल, चोरी आणि इतर गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या ५० जणांना जिल्ह्यात प्रवेश करण्यास मनाई केली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा कायदा कलम १६३ नुसार ही कारवाई करण्यात आली आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी आशित कांबळे यांनी हे आदेश जारी केले आहेत.

या आदेशांनुसार, नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४२, शहादा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३, धडगाव आणि म्हसावद पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील प्रत्येकी १ आणि नवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३ अशा एकूण ५० गुन्हेगारांना उत्सवकाळात जिल्ह्यात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे.या कारवाईमुळे नागरिकांना सण शांततेत आणि सुरक्षित वातावरणात साजरे करता येतील, अशी अपेक्षा आहे. कोणत्याही संशयास्पद हालचालीची माहिती तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहनही जिल्हा पोलीस विभागाने केले आहे.

## भारुडातून नवसाक्षर योजनेसाठी समाजप्रबोधन मुख्याध्यापक कैलास लोहार यांचे कौतुक

**नंदुरबार । दिपक गोसावी**
तळोदा येथील चाणक्य पुरी व परिसर गणेश मित्र मंडळाने आयोजित केलेल्या भजन संध्या कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळा, आष्टे येथील मुख्याध्यापक आणि राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त कैलास लोहार यांनी भारुडाच्या माध्यमातून प्रभावी समाजप्रबोधन केले. यावेळी त्यांनी विशेषतः नवसाक्षर योजनेवर भर देऊन निरक्षर व्यक्तींना शिक्षणाचे आवाहन केले.



खानदेशातील सुप्रसिद्ध भारुडकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोहार यांनी व्यसनमुक्ती, कुटुंबकल्याण, आई-वडिलांचा सांभाळ, भ्रूणहत्या, अंधश्रद्धा, बेटी बचाव-बेटी पढाव आणि निर्मल ग्राम योजना अशा अनेक महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर भारुड सादर केले. त्यांच्या भारुडातील 'अशिक्षित स्त्रीची संसारात होणारी फजिती' आणि 'शिकलेल्या आईची प्रगती' या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

गेल्या ३० वर्षांपासून भारुडाच्या माध्यमातून समाज जागृती करणाऱ्या कैलास लोहार यांनी वासुदेव, गोंधळी आणि स्त्री पात्र अशा विविध वेशभूषांद्वारे अनेक विषयांवर जनजागृती केली आहे. त्यांचे मतदार जनजागृती करणारे वासुदेव आणि गोंधळी वेशातील काम राज्यस्तरावरही प्रशंसित झाले आहे.

या गणेशोत्सवात त्यांनी नवसाक्षर योजनेसाठी केलेल्या प्रबोधनाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत शिक्षणाधिकारी प्राथमिक रोकडे, शिक्षणाधिकारी योजना पारधी, गटशिक्षणाधिकारी शेखर धनगर, शिक्षण विस्तार अधिकारी वसंत जाधव, केंद्रप्रमुख युवराज मराठे आणि जगन्नाथ मराठे यांनी विशेष अभिनंदन केले आहे. कैलास लोहार यांचे हे अभिनव प्रयत्न समाजाला शिक्षणाकडे वळण्यास नक्कीच मदत करतील.

## गणेश संभाजी लगड यांची श्रीगोंदा तालुका पूर्व मंडल सरचिटणीस पदी नियुक्ती

**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**
भारतीय जनता पार्टी, श्रीगोंदा तालुका पूर्व मंडल सरचिटणीस पदी मा. गणेश संभाजी लगड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देशाचे नेते मा. राष्ट्रीय अध्यक्ष खा. जे.पी. नड्डा, माननीय प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण व आमदार मा. श्री. विक्रम बबनराव पाचपुते यांच्या मार्गदर्शनानुसार भारतीय जनता पार्टीच्या ध्येय धोरणांचा आपण समाजामध्ये सर्वदूर प्रचार व प्रसार करावा, अशा सूचना डॉ. विक्रम बळभिमराव भोसले (श्रीगोंदा पूर्व मंडल तालुकाध्यक्ष) यांनी दिल्या आहेत. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब महाडिक, भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप सर नागवडे, भाजप जिल्हा सरचिटणीस शुभांगी ताई सप्रे, कोळगावचे माजी सभापती व लोकनियुक्त सरपंच भैयासाहेब लगड,



माजी उपसरपंच नितीन अण्णा नलगे,अल्पसंख्यांक जिल्हा अध्यक्ष अकिल इनामदार ,ग्रामपंचायत सदस्य जयराज लगड ,प्रदीप आढाव ,सपाटे मेजर,कल्याण आढाव युवा नेते अमोल दादा लगड, आणि दादासाहेब लगड हे उपस्थित होते. गणेश संभाजी लगड यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या भावी कार्यासाठी मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

## ठाणे शहर गुन्हे शाखा व खंडणी विरोधी पथकाकडून ०४ अग्निशस्त्रे व ८ काडतुसे विक्री करणारे तिघे अटकेत

**ठाणे । प्रतिनिधी**
सध्या सुरू असलेला गणेशोत्सव तसेच अगामी ईद-ए-मिलाद इ. सण-उत्सव कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहुन कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडण्याच्या पार्श्वभुमीवर मा. पोलीस आयुक्त सो ठाणे शहर यांनी गुन्हे शाखेच्या पथकांना अवैध शस्त्र खरेदी विक्री करणाऱ्या, अंमली पदार्थाचा व्यापार करणाऱ्या तसेच इतर अवैध धंदे करणाऱ्या जास्तीत जास्त इसमां विरूध्द सक्त कारवाई करण्याबाबत सक्त आदेश दिले होते. सदर आदेशाची अंमलबाजवणी करण्यांच्या व कारवाई करण्याच्या अनुषंगाने गुप्त माहिती मिळवीत असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांनी पहाटेच्या सुमरास इसम नामे आकाश व त्याचे दोन मित्र अक्षय व बिट्टु हे कल्याण स्टेशन परिसरात अग्नीशस्त्र व काडतुसे कोणाला तरी विक्री करण्याकरिता येणार आहेत असे समजले.

सदर मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक, सचिन कुंभार यांनी कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचला असता अक्षय नथनी सहानी, वय २० वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा.उत्तर दिल्ली, २) बिंदु धरमविरसिंग गौर, वय २६ वर्षे, रा.उत्तर प्रदेश, ३) आकाश दुर्गाप्रसाद वर्मा, वय २३ वर्षे, रा. सेंट्रल दिल्ली यांना ताब्यात घेऊन २ देशी बनावटीचे पिस्टल, २ देशी कट्टे, ८ जिवंत काडतुसे असा एकूण १,८२,५००/- रू. किमतीचा मुददेमाल अवैधरित्या विक्री करण्याचे इरादयाने बेकायदेशीररित्या विनापरवाना आपले कब्जात बाळगुन, ठाणे शहर यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयाचे हददीत घातक शस्त्रे बाळगण्यास मनाई असल्याबाबत काढलेल्या आदेशाचा भंग करीत असताना मिळुन आले आहेत. त्यांच्याविरूध्द महात्मा फुले चौक, पोलीस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना लागलीच अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीची कोर्टातुन पोलीस कोठडी रिमांड मिळाली आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सुभाष तावडे, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा ठाणे शहर करीत आहे. सदरची कारवाई अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. विनय घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त शोध-२, गुन्हे शाखा, यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील वपोनि/शैलेश साळवी यांच्या टीमने केले आहे.



## संपादकीय

# आता झुंज मान्सूनशी



मान्सून म्हणजे केवळ पाऊस नसून, तो संपूर्ण वातावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. हा एक असा नैसर्गिक बदल आहे, जो वाऱ्यांच्या दिशेमध्ये होतो. मान्सूनच्या आगमनानंतर कधी जोरदार पाऊस पडतो, कधी हलका तर कधी-कधी दुष्काळसदृश्य परिस्थितीही निर्माण होते. मान्सूनचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडतो. तो आपल्या शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचा आहे. सध्या संपूर्ण उत्तर भारत मान्सूनच्या संकटाशी झुंज देत आहे. जम्मू आणि काश्मीर, उत्तराखंड आणि पंजाब या उत्तरेतील राज्यात मान्सून पावसाचा कहर सुरू आहे. एनडीआरएफ आणि लष्कर तसेच इतर एजन्सीजनी आपले कार्य वाढवले आहे तरीही मान्सून आणि त्यामुळे होणाऱ्या नुकसानाची तीव्रता वाढतच आहे. जम्मू आणि काश्मिरातील मृतांची संख्या ४१ वर गेली आहे. पावसाचा मारा आणि मैदानी प्रदेशात नद्यांना पूर यामुळे ठिकठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. उत्तर भारतातील टेकड्या आणि मैदानांवर पावसाचा तडाखा बसला असून त्यामुळे कित्येक प्रदेश पाण्याखाली गेले आहेत. वैष्णोदेवी मार्ग सध्या पावसाच्या तडाख्यात सापडला असून या यात्रेतील कित्येक यात्रेकरूंचे जीव गेले आहेत. २०१३ साली जशी पावसाने विनाशाची लाट आणली होती तितकीच भयंकर लाट यंदाही आली. संपूर्ण उत्तर भारताला पावसाच्या विनाशकारी लाटेचा सामना करावा लागत आहे. एकट्या जम्मू प्रदेशात २४ तासांत १९०.२४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमधील गावांना पावसाचा रोष सहन करावा लागला आहे आणि काही गावे काही सेंकंदाच्या आत नष्ट झाली आहे. अर्थात या मागे कोणतीही परमेश्वरी शक्ती नाही तर मानवाचा प्रचंड अहंकारी आणि विध्वंसक लोभ हेच कारण आहे. कारण जम्मू असो वा काश्मीर किंवा आपल्याकडे मराठवाडा, येथे बिल्डरांनी पाणी अडवायला जागाच ठेवली नाही. त्यामुळे उत्तराखंड असो की मराठवाड्यातील नांदेड किंवा पंजाब असो, येथे विनाशाची लाट येत आहे.मान्सूनचा पट्टा हिमालयाच्या पायथ्याशी सरकला आहे आणि त्यामुळे येथे भूस्खलन, दरडी कोसळणे असे प्रकार वारंवार होत आहेत. पंजाब आणि हिमाचल येथील म्हणजे भारतीय उपखंडात पश्चिमी विक्षोभ हिमालय पर्वतामुळे अडवले जातात आणि त्यामुळे प्रचंड असा प्रलयकारी पाऊस पडतो. उत्तर भारतात अशीच विनाशाची लाट सध्या दिसत आहे. ती दरवर्षीच येते पण २०१३ मध्ये ती जशी विनाशकारी होती तशीच यंदा आहे. पश्चिमी विक्षोभामुळे या प्रदेशात भूस्खलन आणि ढगफुटीसारखे प्रकार घडतात आणि त्यातच दुर्घटना घडतात. काश्मिरातील रामबन येथे ११ जणांचा मृत्यू झाला, तर वैष्णोदेवी मार्गावर भूस्खलन झाल्याने ३४ यात्रेकरूंचा मृत्यू झाला, या सर्वांचा एकच अर्थ आहे. निसर्गावर मानवाने मात केली तर निसर्ग ते सहन करत नाही आणि कधी ना कधी त्याचा बदला घेतोच. कारण काश्मीर असो, की उत्तराखंड असो, की अगदी महाराष्ट्र असो या सर्वच ठिकाणी जागेची अपरंपार हाव आणि जमिनी हडपण्यामुळे बिल्डरांची लॉबी सक्रीय झाली. ती महाराष्ट्रापासून ते उत्तराखंडपर्यंत आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र पसरली आहे. त्या लॉबीची कृत्ये लोकांना मृत्यूच्या दारात ढकलतात. काश्मीर जे एकेकाळी पृथ्वीवरील स्वर्ग म्हटले जात होते. त्याचे रूपांतर आता जलाशयात आणि बिलडरांच्या अनिर्बंध लालसेपोटी कुख्यात बांधकाम सागरात झाले आहे. पावसाचा कहर आणि निसर्गाचे थैमान यामुळे सर्वात जास्त हानी होते ती काश्मीरची. कारण पर्यटनावरच तर काश्मीर, गोवा, केरळ ही राज्ये जगतात. यावरच त्यांची अर्थव्यवस्था असते. उत्तराखंडमध्ये तर अनेक बांधकामे उभी राहिली आहेत, की जी निसर्गाला गिळंकृत करत आहेत. त्यामुळे उत्तराखंडचे काय झाले ते आपण पाहतोच आहोत. तसेच काश्मीर आणि आता तर कोकण जे निसर्गाचे वरदान लाभलेले आहे त्याची अवस्थाही तशीच आहे. हिमालयातील नद्या उन्हाळ्यात वितळतात आणि त्यामुळे पूर येतात. उत्तरेतील नद्या या सपाट प्रदेशात असल्यामुळे त्यांची ड्रेनेजची कमी क्षमता असते. हवामान बदलामुळे अतिवृष्टी वाढते. गंगेसारख्या मोठ्या नद्या हिमालयातून उगम पावतात आणि सपाट मैदानात त्यांचा उतार कमी असतो. यामुळे पाण्याचा निचरा होत नाही. आपल्याकडेही मुंबईत २००५ साली असाच महापूर आला होता आणि त्याचे मुख्य कारण होते ते मिठी नदीच्या पाण्याचा निचराच झाला नाही. तसेच उत्तरेतील नद्यांचे आहे. पण ही झाली नैसर्गिक कारणे. मानवी कारणे जास्त जबाबदार आहेत आणि ती असतात अनियोजित शहरीकरण आणि सिमेंटची बांधकामे असल्यामुळे नैसर्गिक ड्रेनेजचा मार्ग बंद होतो. काश्मीर काय किंवा उत्तर भारत काय, याच कारणांमुळे सध्याचा पूर आणि भयावह परिस्थिती ओढवली आहे.उत्तराखंड असो, की काश्मीर असो की महाराष्ट्र, बिल्डरांची लॉबी सर्वत्र फोफावली आहे आणि तिला काहीही तरणोपाय नाही. सरकारे त्यावर उपाय करू शकत नाहीत किंवा करू इच्छित नाही. कारण बिल्डरांचा मलिदा सरकारी यंत्रणेलाही मिळालेला असतो. त्यमुळे यावर कुणाकडेच काही उपाय नाही, आता पावसाचे रौद्र रूप पाहणे आणि विनाशाच्या लाटेत वाहून जाणे हेच सामान्य माणसांच्या भाळी लिहीले आहे की काय अशी भीती वाटते. पावसाचे रौद्र रूप काश्मीरपासून ते अगदी मराठवाड्यातील नांदेडपर्यंत पाहायला मिळाले. कधी ही सृष्टी आपला घास घेईल याचा काहीच भरोसा नाही. पण तिला तरी दोष का द्यायचा. आपणच मानव सृष्टीच्या विनाशास कारण आहोत. निसर्गाच्या विनाशास मानवाची अति लोभी वृत्ती कारण आहे आणि त्याचे प्रत्यंतर जम्मू-काश्मीरपासून ते उत्तराखंडपर्यंत सर्वत्र येत आहे, त्यावर उपाय आपल्याकडेच आहे. मानव आणि निसर्ग यांच्यात सुसंवाद साधणाऱ्या इतक्या सर्व संस्था कार्य करतात. पण त्यांच्यात सुसंवाद नाही, तो प्रस्थापित केला पाहिजे, तरच मानव आणि निसर्ग या दोघांनाही आपल्याला वाचवता येईल.

# पावसाच्या संततधारेत कोकण उत्साहीच!

कोकणवासीय नेहमीच प्रत्येक बाबतीत परिस्थितीला सामोरे जातो. कोकण नेहमी कोणतेही सण, उत्सव साजरे करण्यात महाराष्ट्रात सर्वात पुढे असतात. कोकणवासीयाच्या खिशात फार काही नसलं तरी त्यातही तो गणपती उत्सव दणक्यातच करणार हे वर्षानुवर्षे घडत आले आहे. फळ बागायत असली किंवा भातशेती असली त्यात नफा, नुकसान झाले तरी गणपतीचा सण अफाट उत्साहातच तो कुटुंबासोबत साजरा करणार.

अखंड महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा होत आहे. महाराष्ट्रातील बहुतेक प्रांतात त्या-त्या भागातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे गणेशोत्सव साजरा होतो; परंतु कोकणातील रायगड, रत्नागिरी, पालघर, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये मात्र गणेशोत्सव हा काही प्रमुख शहरी भागात मंडळांमार्फत गणेशोत्सव साजरा केला जातो; परंतु गावो-गावी प्रत्येक गावातील वाडी-वस्तीत घरा-घरांमध्ये त्या-त्या कुटुंबाचा गणपती असतो. त्या कुटुंबातील नोकरी व्यावसायानिमित्ताने जर बाहेरगावी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक अशा शहरांमध्ये असेल किंवा परदेशात कोणी असेल त्या कुटुंबातील सदस्यही आपल्या मुळगावी घरी येणार हे या गणपती उत्सवाचे वैशिष्ट्य आहे. यावर्षी गेले महिनाभर पावसाने एखादा दिवस उसंत घेतली. मात्र सतत पाऊस कोसळतोच आहे. गणेश चतुर्थीआधी आठवडाभर पाऊस कोसळत होता. त्यामुळे कोकणातील शेतकऱ्याला वाटले होते गणपतीच्या सणासुदीच्या दिवसात पाऊस नसेल. पण या लहरी पावसाने नेहमीप्रमाणे चकवा दिला आणि घडल भलतच. अगदी हरितालिकेच्या दिवशी पाऊस थांबला नाही. गावो-गावी गणपती मूर्ती घरी घेऊन येणेही ग्रामस्थांना अवघड झाले. पाऊस संततधार कोसळत असल्याने लहान-मोठे व्यावसायिक या गणेशोत्सवाआधी त्यांच्या होणाऱ्या व्यवसायावर सणाला चारपैसे जास्त कमावण्याच्या मागे असतात. या सणात त्यांच्या हाती थोडे जास्त पैसे येतात; परंतु त्यातही पावसाने कहरच केला. पाऊस संततधार कोसळत असल्याने त्या छोट्या व्यावसायिकांनाही नुकसान सोसावे लागले. गणेश चतुर्थीच्या गणेश आगमनादिवशी ग्रामीण भागात गावातील आप-आपल्या वाडीतील गणपतींना नमस्कार करण्यासाठी दरवर्षी घराबाहेर पडतात; परंतु पावसाची संततधार असल्याने एक-दुसऱ्याकडे गणपती दर्शनासाठी जाणाऱ्यांना घरीच थांबावे लागले.



काही गावांतून वर्षभराने गावातील गणपती उत्सवाच्यानिमित्ताने येणाऱ्यांनी सर्वांच्या घरी जाऊन गणपतीचे दर्शन घेण्याचे ठरवलेले असते; परंतु त्यावरही पाणी फिरले. कुणालाच घराबाहेर पडता आले नाही विशेषकरून सह्याद्री पट्ट्यांतील गावांमध्ये पावसाची संततधार आणि दाट धुके असं हे निसर्गाच विहंगमदृश्य सह्याद्री पट्ट्यातील गावातून अनुभवयाला मिळाले; परंतु पाऊस असल्याने गणेशभक्तांचा हिरमोडही झाला. हा पाऊस कधी थांबणार अशा प्रश्नाची चर्चाच सर्वत्र केली जात आहे. थोडावेळ पाऊस थांबला अस वाटत असताना अधिक जोरात पाऊस कोसळतो. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर या सर्वच जिल्ह्यांमध्ये पावसाची संततधार सुरूच आहे. एकीकडे सतत कोसळणारा हा पाऊस भातशेतीला कितपत पुरक ठरेल किंवा या संततधार पावसामुळे भातशेती कुजण्याची भीतीही कोकणातील शेतकऱ्यांकडून वर्तविली जात आहे. हवामानाच्या बेभरवशाने कोकणातील भातशेती, आंबा, काजू, कोकम, नारळ या फळ पिकांचेही गेलीकाही वर्षे नुकसान मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे या पावसामुळे नेमकेपणाने काय घडेल हे ठरविणेही शेतकऱ्यांना अवघड झाले आहे. पाऊस सतत कोसळत असल्याने भातशेतीचेही गणित बिघडण्याची शक्यता वर्तविली जाते. शेवटी हवामान खात्याने वर्तविलेले अंदाज जरी खरे ठरत असले तरीही त्याचे होणाऱ्या परिणामाने जे नुकसान होणारे आहे ते नुकसान मात्र कुणालाच थांबवता येणारे नाही. कोकणातील अनेक मार्गावरील रस्तेही या अतिपावसाने खराब झाले आहेत. रस्ता कुठला आणि खड्डा कुठला असा प्रश्न पडावा अशी स्थिती काही गावातून झाली आहे. या पावसाने काही मार्गच बंद झाले. या गणेशोत्सवाच्या काळातील पावसाने काही मार्गावर पाणी आले आणि या पाण्यामुळे गावांचा संपर्क तुटण्याचे प्रकारही घडले आहेत. मात्र, तरीही कोकणवासीय कधीच डोक्याला हात लावून रडत बसत नाही. कोकणवासीय नेहमीच प्रत्येक बाबतीत परिस्थितीला सामोरे जातो. कोकण नेहमी कोणतेही सण, उत्सव साजरे करण्यात महाराष्ट्रात सर्वात पुढे असतात. कोकणवासीयाच्या खिशात फारकाही नसलं तरी त्यातही तो गणपती उत्सव दणक्यातच करणार हे वर्षानुवर्षे घडत आले आहे. फळ बागायत असेल किंवा भातशेती असली त्यात नफा, नुकसान झालेतरी गणपतीचा सण अफाट उत्साहातच तो कुटुंबासोबत साजरा करणार. यावर्षी सतत कोसळणारा पाऊस एकीकडे होता तरीही कोकणवासीयांनी गणेशोत्सव त्याच उत्साहात, थाटात आणि आनंदी वातावरणात साजरा केला.

या गणेशोत्सवाच कोकणात एक खास वैशिष्ट्य गावो-गावी गावातील वाडीत पाहायला मिळत ते म्हणजे भजनमेळे. या भजनमेळ्यांमध्ये एकाच भजन मेळ्याचे दोन, चार भजनमेळे कधी होतात ते समजत देखील नाही. बरं या भजन मंडळांची गंमत म्हणजे ही भजन मंडळ आणि त्यातली न दिसणारी स्पर्धा या कधीच कुठे दिसत नसतात; परंतु त्यात 'आमचे भजन कसे सरस, आमच्या बुवाने घेतलेला गजर किती भारी होता याच्या गजालीही कोकणात चण्याच्या पिठाच्या करंज्या खाताना अशा काही रंगतात की यातच गणपती उत्सवाचे दिवस संपतात. अनंत चतुर्थीला किंवा पाच, सात दिवसांच्या गौरी-गणपतीच्या विसर्जनानंतर थांबलेल्या असतात. भजन मेळ्यांची फारशी न दिसणारी; परंतु अस्तित्वात असणारी स्पर्धा गणपती विसर्जनादिवशी थांबते, संपते. गणपती उत्सवात काहीसा भजन मेळ्यातील दोन-दोन मेळ्यांनी निर्माण झालेला काहीसा रूसवा, फुगवा काहीसा दुरावा संपतो आणि कोकणातील 'म्हाळवस' पितृ पंधरवड्याला प्रारंभ झाला की सारे रूसवे, फुगवे दूर होऊन सारे एक-दुसऱ्याकडे वडे, काळ्या वाटाण्याची आमटी, खिर अशा पदार्थांबरोबरच सोबतच्या भाज्यांचा आस्वाद घेण्यासाठी पुन्हा वाडीतील सारी भावकी एकवटलेली असते. दरवर्षी कोकणातील गावो-गावी काहीसे कमी-अधिक प्रमाणात दिसणारे हे दृश्य असले तरीही कोकणातील गणपतीचे आगमन गणपतीच्या वास्तव्याचा पाच, सात, अकरा दिवसांचा कालावधी हे दिवस कोकणवासीयांसाठी अक्षरश: भारलेले दिवस असतात. काहीही करून कोकणवासिय आपलं गाव, घर गाठणार आणि त्याला जमेल त्या पद्धतीने कोकणवासीय अतिशय आनंदाने अमाप उत्साहाने आणि गणपती विसर्जनानंतर काहीसा भावनाविवश होत पुढच्या वर्षी लवकर या अशा जड अत:करणाने बाप्पाला निरोप देतो.

# पर्यावरणाचे भान ठेवा! बोला, गणपती बाप्पा मोरया!!

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत भारतीयांना एकत्र येण्यास आणि सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यास बंदी होती. लोकमान्य टिळकांनी हे लक्षात घेतले की गणपती उत्सव हा धार्मिक श्रद्धेशी जोडलेला असून त्याद्वारे समाजातील सर्व स्तरातील लोकांना एकत्र आणता येईल. त्यामुळे त्यांनी गणेशोत्सवास सार्वजनिक स्वरूप दिले, जेणेकरून राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत होईल. टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून व्याख्याने, देशभक्तीपर भाषणे आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून जनतेत स्वातंत्र्याची ठिणगी पेटवली. आजच्या घडीला गणेशोत्सव हा महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात आणि परदेशातही मोठ्या उत्साहाने साजरा केला जात आहे आणि टिळकांचे हे योगदान अजूनही लोकांच्या मनात अमूल्य आहे.





जो गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी सुरू केला तो तसाच आज साजरा होतो का? आज साजरा होणाऱ्या या उत्सावावर टीका होत आहे. टिळकांचा उद्देश आज जरी आवश्यक नसला तरी हा गणेशोत्सव आजही जनसमुदायाला एकत्रित करत आहे हे देखील विसरता कामा नये. मुंबईतील गणेशोत्सवावर बरीच चौफेर टीका होताना आपण पाहतो, त्या उत्सवाला आलेले स्वरूप त्यातील मागे पडत चाललेला उद्देश, त्यात बेधुंद झालेली तरुणाई या उत्सवात इतरांचा विचार न करता नियम पायदळी तुडवणे हे प्रकार सर्वत्र सर्रास सुरू असण्याची टीका होत आहे. दुसरीकडे गणेशोत्सवामुळे पर्यावरणाचे नुकसान होते म्हणून पर्यावरणवादी नियमितपणे गणेशोत्सवात कार्यरत होतात व विघ्ने आणण्याचा प्रयत्न करतात. त्यात न्यायालयाने दिलेले निरनिराळे आदेश त्यात सापडलेला मूर्तिकार, हल्ली लागू केलेले सरकारी कडक नियम यातून गणेशोत्सव नित्यनेमाने साजरा करणाऱ्यास खूप अडथळे निर्माण होत आहेत. कितीही महागाई असू दे मात्र गणपती उत्सवात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. त्यात कोणी एकेकाळी मराठी महाराष्ट्राशी विशेषतः कोकणाची निगडित असलेला सण आता इतर प्रांतात नव्हे तर देशातच नव्हे तर प्रदेशातही दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे हे ही विशेष. आज इतकी वर्ष गणेशोत्सव साजरा होत आहे त्यात पीओपी व शाडूच्या मूर्ती बनवल्या जातात. त्यांचे विसर्जनही नैसर्गिक पाण्यात होत आहे. मात्र तेव्हा कधी प्रदूषण झालेले आठवत नाही मात्र आत्ताच प्रदूषण होत आहे अशी बोंबाबोंब का होत आहे. मूर्ती मातीचीच असावी लागते. मात्र हल्ली कशाच्याही मूर्ती बनवून त्याला विकृत रूप दिले जाते. कागदाच्या लगद्यापासून बनवलेल्या मूर्ती पर्यावरणपूरक असतात. मात्र हा दावा चुकीचा असून उलट कागदाचा लगदा पाण्यातील प्राणवायू (ऑक्सिजन) शोषून घेतो आणि सजीवांसाठी हानीकारक असलेला मिथेन हा वायू उत्सर्जित करतो. कागदातील 'लिग्निन' घटक जैविक ऑक्सिजनची मागणी वाढवतात, जे जलचरांसाठी हानीकारक आहे. कागदाचा लगदा लहान तुकड्यांमध्ये विघटित होतो, जे जलचरांसाठी हानीकारक आहे. काही स्वयंसेवी संस्था आणि पर्यावरणवादी असा दावा करतात की, 'गणेशमूर्तीचे नद्यांमध्ये विसर्जन केल्याने जलप्रदूषण होते.' ते मूर्ती विसर्जनासाठी कुत्रिम हौदांमध्ये मूर्ती विसर्जित करणे, स्वयंसेवी अथवा सरकारला मूर्ती दान करणे किंवा अमोनिया बाय कार्बोनेटेडमध्ये मूर्ती विरघळवणे असे उपाय सांगतात. मात्र दान केलेल्या मूर्तींचे दगडाच्या खाणीत टाकून तसेच नद्यांमध्ये फेकून विटंबना केली जाते. गणेशमूर्ती विसर्जन केल्याचे आध्यात्मिक लाभ आहे. मूर्ती रसायनात विसर्जित केल्यास हे लाभ होऊ शकत नाही, देवतेची मूर्ती दान देणे किंवा स्वीकारणे' हा देवतांचा घोर अपमान आहे; कारण मानवात देवतेच्या मूर्तींचे दान देण्याची किंवा स्वीकारण्याची क्षमता नाही. अध्यात्मशास्त्रानुसार गणेशमूर्तींचे वाहत्या पाण्यातच विसर्जन करणे शास्त्रानुसार योग्य आहे. हे ढोंगी पर्यावरणवादी वर्षभर गाढ झोपेत आढळतात आणि केवळ हिंदू सणांच्या वेळीच जागृत होतात. दुसरा वाद होतो, की पीओपी की शाडूची मूर्ती. जरी शाडूच्या मुर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्तीपेक्षा वजनाला जड आणि महाग असल्या तरी दरवर्षी अनंतचतुर्दशीनंतर दुसऱ्या दिवशी येणारे फोटो पाहून मन हेलावून टाकते. काही स्वयंसेवक आणि संस्था सोडल्या तर बाकी जनतेत याबाबत निरुत्साहच दिसून येतो. दिवसेंदिवस सार्वजनीक गणपतीच स्वरुप बाजारु होत चाललय. गणपतीच्या उंचीवरून विभागातल्या गणेशमंडळात चढाओढ असते. मात्र शाडूच्या मूर्तीमुळे गणेश मूर्तींच्या आकारावर बंधन येणार आहेत. म्हणून आजही पीओपीला जास्त प्राधान्य दिले जात आहे. एकट्या मुंबईमध्ये दोन लाख २५ हजार इतके घरगुती गणपती आहेत. त्यांपैकी २०-२२ टक्के घरांनी शाडू मातीच्या किंवा पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा पर्याय स्वीकारला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची संख्या १२ हजारांच्या घरात आहे. त्यापैकी १० ते १२ टक्के मंडळांनी पर्यावरणपूरक उत्सवाचा मार्ग पत्करला आहे. मुंबईमध्ये सध्या तीन हजार मूर्तिकार गणेशमूर्तींचे काम करतात. त्यांच्याकडील कारागिरांची संख्या २० हजारांच्या घरात आहे. या निमित्ताने निर्माण होणाऱ्या इतर व्यवसायांवर लाखो कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. एकट्या पेण, हमारापूर पट्ट्यात ५० हजारांहून अधिक कुटुंबे गणेशमूर्ती घडविण्याच्या व्यवसायात आहे. सध्या तरी ९० टक्के व्यवसाय 'पीओपी'शी संबंधित आहे. पीओपी'ला उत्तम पर्याय द्या आणि मग त्यावर बंदी घाला, अशी मंडळांची मागणी आहे.दुसरीकडे, न्यायालयाच्या निर्णयाचा मान राखणेही आवश्यक आहे, अशा कात्रीत सध्या सरकार सापडले आहे. त्यातच राज्य सरकार, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महापालिकांकडून वेगवेगळ्या नियमावली येत असल्याने, गोंधळात अधीकच भर पडत आहे. हे जरी किती खरं असले तरी आपले सगळे आपणच साजरे केले पाहिजे. आज या सणांनी आपली मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते. कित्येक लोकांना रोजगार मिळतो. कोकणवासीयांची गावाला जाणारी लगबग त्याच निमित्ताने सर्वांनी एकत्र मिळून गावाला आपल्या घरी घालवले गेलेले एकत्र क्षण गणपतीसोबतच हरतालिका गौरी यांचे आगमन त्यातून निर्माण होणारे एक चैतन्याचे वातावरण मनाला मोहरून टाकते. त्यात पावसानेही धरती ओलीचिंब न्हाऊन निघाली असल्याने त्यात आणखी मनमोहकतेची भर पडते. आपल्या विभागातील सार्वजनिक गणेशोत्सवात होणारे कार्यक्रम सर्वांनी एकत्र येणे त्या निमित्ताने होते. हल्लीचे जग खूप फास्ट आहे. आधुनिकतेकडे आपण किती जायचे म्हटले तरी शेवटी माणसाला एक अध्यात्मची जोड हवीच असते. या यांत्रिक युगात त्यालाही कुठेतरी थांबावसे वाटते. हे आपलेच सण ते त्यांना असे क्षण देऊ इच्छितात. टिळकांचा उद्देश त्याकाळी काहीही असो मात्र काही अपवाद वगळता आज याच उत्सवाला एक ग्लोबल स्वरूप प्राप्त झाले आहे. म्हणूनच हा महाराष्ट्राचा महाउत्सव म्हणून घोषित करण्यात आला आहे. आज आपल्या देशात नव्हे जगभरातही मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा केला जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात, की साता-समुद्रापारच्या त्या देशांनाही या उत्सवांची नोंद घ्यावी लागत आहे. कोणत्याही चांगल्या गोष्टींना विरोध होतोच मात्र त्यातूनही मार्ग काढून आपण आपली मार्ग क्रमिकापुढे सुरू ठेवायची असते, हेच गणराया आपल्याला शिकवतो म्हणून किती अडथळे आले तरी आपण मात्र आपले हे सण साजरे करणारच. यासाठी निसर्गाची कुठेही हानी होणार नाही, ज्यामुळे आपल्या येणाऱ्या पिढ्यांना त्याचा त्रास भोगावा लागेल. गणराया हे बुद्धीचे दैवत आहे हेच भान ठेवून आपणही आपली बुद्धी शाबूत ठेवून एक धार्मिकतेचा आधार ठेवून आपण आपले सण साजरे करूया! हाच निर्धार आपण कायम ठेवून बोलूया गणपती बाप्पा मोरया!!

# विजय वखरे यांचे संगीतमय पारायण थाटात संपन्न

श्री संत गजानन महाराज यांच्या समाधी सोहळ्याच्या निमित्ताने गुरूवार दिनांक २८ ऑगस्ट २०२५ ऋषीपंचमीला जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले सभागृह, रेशिमबाग, नागपूर येथे दुपारी ४ वाजता श्री गजानन विजय ग्रंथ सुश्राव्य संगीत पारायण आयोजित करण्यात आले होते.यामध्ये श्री गजानन महाराज विजय ग्रंथातील २१ अध्यायांवर आधारित २१ गीतांच्या संगीत पारायणाचा आगळावेगळा कार्यक्रमाचा आनंद मोठ्या भक्तिभावाने भक्तगणांनी घेतला व अनेक भक्तगण पारायणात सुध्दा सहभागी झाले.प्रथमच तयार करण्यात आलेला हा आगळावेगळा उपक्रम श्री गजानन उपासना केंद्र, माधवनगर, नागपूर यांच्या संयोगाने याठिकाणी प्रस्तुत करण्यात आला होता व संपूर्ण भक्तगण मंत्रमुग्ध झाले.यावेळी श्री गजानन विजय ग्रंथाचा सुरेल सांगीतिक आविष्कार सर्वांना पहायला मिळाला.या कार्यक्रमाचे सारांश अध्याय वाचन सुषमा वखरे यांनी केले.या कार्यक्रमाचे निर्माता, संगीत दिग्दर्शक व काव्यरचना श्री विनोद वखरे यांनी यावेळेस संपूर्ण शेगांवमय वातावरण निर्माण करून जनुकाय शेगांवचे दर्शन घडल्याचे सर्वांनाच वाटायला लागले.याला मधुन संगीताची साथ देतील संगीत संयोजन श्री श्रीकांत पिसे यांनी व कार्यक्रमाला बहारदार आणि रसाळ करण्यासाठी गायक कलाकार रसिका बावडेकर, विनोद वखरे,यश खेर, स्वरदा देशपांडे आणि वादक कलाकारांच्या माध्यमातून नवं चैतन्य निर्माण करून शेगावमय वातावरण निर्माण करण्याचे काम गोविंद गडीकर, अरविंद उपाध्ये,श्रीकांत पिसे, मोरेश्वर दहासहस्त्र, विशाल दहासहस्त्र यांच्या रंगारंग भक्तीमय सरांनी कार्यक्रमाला आगळावेगळे स्वरूप आले.कार्यक्रमाच्या शेवटी शेगाव प्रमाणे महाआरती करण्यात आली व याचा लाभ हजारों भक्तांनी घेतला व यानंतर महाप्रसादाला सुरूवात झाली.हजारो गजानन भक्तांचा जनसमुदाय पाहून विनोदजी जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी आणि संपूर्ण भक्तगणांचे आभार मानले.

–रमेश लांजेवार

# ग्रामीण भागातील प्रत्येक रस्त्याला विशिष्ट क्रमांक
# महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा महत्त्वाकांक्षी निर्णय

**मुंबई। प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेवर आणि अतिक्रमणांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी ग्रामीण भागातील रस्ते, गाडीमार्ग, पायमार्ग आणि शेतरस्त्यांचे सीमांकन करून त्यांना विशिष्ट सांकेतांक (कोड) देण्याची नावीन्यपूर्ण कार्यपद्धती निश्चित केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना बारमाही रस्त्यांची सुविधा मिळण्यासह अतिक्रमणाच्या समस्येवर नियंत्रण मिळणार आहे.महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले, ग्रामीण भागातील रस्ते हे शेतकऱ्यांची जीवनवाहिनी आहेत. शेतीची कामे आणि शेतीमाल बाजारात पोहोचवण्यासाठी चांगल्या रस्त्यांची गरज आहे. या निर्णयामुळे गावनिहाय रस्त्यांचे सीमांकन होईल, अतिक्रमण हटवले जाईल आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

या निर्णयानुसार, प्रत्येक गावातील ग्रामसेवक, तलाठी, कोतवाल आणि पोलीस पाटील यांच्या मदतीने गावातील सर्व रस्त्यांची यादी तयार केली जाईल. ही यादी ग्रामसभेच्या मान्यतेनंतर तहसीलदारांकडे सादर होईल. तहसीलदार ती भूमी अभिलेख विभागाकडे पाठवतील, जिथे आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे रस्त्यांचे सीमांकन होऊन हद्दीवर सीमाचिन्हे लावली जातील. अतिक्रमित रस्त्यांवर मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ अंतर्गत कारवाई होईल आणि आवश्यकतेनुसार पोलीस यंत्रणेची मदत घेतली जाईल. प्रत्येक रस्त्याला जिल्हा, तालुका, गाव आणि रस्त्याच्या प्रकारानुसार विशिष्ट सांकेतांक दिला जाईल.

रस्त्यांची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी गाव नमुना नंबर १ (फ) नावाची नवीन नोंदवही सुरू करण्यात आली आहे. तसेच, या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांचा समावेश आहे. या समित्या रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रस्ताव तयार करतील आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवतील.



## सुप्रिया सुळे जरांगेंच्या स्टेजवर गेल्याच कशाला?
# शरद पवारांचाही पाठिंबा आहे का? ओबीसी नेते शेंडगेंचा संतप्त सवाल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–आमचा सुप्रिया सुळे यांना सवाल आहे ते जरांगेंच्या स्टेजवर गेल्याच कशाला? त्यांच्या वडिलांनी देशात पहिल्यांदा ओबीसी समाजाला मंडल आयोग लागू करून आरक्षण दिले आणि त्याच आज जरांगेना पाठिंबा द्यायला स्टेजवर जातात? याला शरद पवारांचा पाठिंबा आहे का? असा सवाल ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केला आहे. सुप्रिया सुळे यांनी आज मनोज जरांगे यांची आझाद मैदानात जाऊन भेट घेतली, यावरून शेंडगे यांनी टीका केली आहे.प्रकाश शेंडगे म्हणाले, सुप्रिया सुळे यांना कोणी दगड मारले हा आमचा प्रश्न नाही, ते सरकार आणि पोलिसांनी पहावे. जरांगे यांची कायद्याला धरून मागणी नाही, घटनेला धरून मागणी नाही. कोणीतरी म्हणते गोळ्या घातल्या तरी मागे हटणार नाही आणि त्यांच्या स्टेजवर सुळे जातात. याबाबत आम्ही शरद पवारांची भेट घेणार आणि याबाबत त्यांना प्रश्न विचारणार, असे शेंडगे यांनी म्हटले आहे.




पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, मनोज जरांगे यांची मागणी कायद्याला धरुन नाही. याबाबतीत कागदपत्रे माझ्याकडे आहेत. ॲड जयश्री पाटील विरुद्ध महाराष्ट्र सरकार या केसमध्ये कोर्टाने स्पष्ट केले आहे. कुणबी वेगळे आहेत, मराठा वेगळे आहेत. त्यामुळे जी मागणी केली जात आहे ती घटनेला धरुन नाही.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेमलेली शिंदे समिती आणि त्यांनी दिलेला अहवाल हा बोगस असल्याची टीका प्रकाश शेंडगे यांनी केली आहे. ते म्हणाले, याबाबत आमची कायदेशीर लढाई सुरू आहे. ५८ लाख देण्यात आलेले दाखले बोगस आहेत. मराठा समाजाची फसवणूक सुरु आहे. सर्व दाखले बाद होणार आहेत. पुढे बोलताना प्रकाश शेंडगे म्हणाले, इतिहासातील गॅझेटमध्ये नाव आहे म्हणून तो मागास आहे असे होत नाही. त्यामुळे देण्यात आलेले दाखले बोगस आणि खोटे आहेत. जर असे दाखले देणे शक्य असते तर पूर्ण देश ओबीसी झाला असता. उद्या दुपारी ३ वाजता मिटिंग आहे. आम्ही सर्व ओबीसी एकत्र येत आहोत आणि या सगळा गोष्टींच्या विरोध करणार आहोत असे शेंडगे म्हणाले.

## ठाणे शहर गुन्हे शाखा व खंडणी विरोधी पथकाकडून
# ०४ अग्निशस्त्रे व ८ काडतुसे विक्री करणारे तिघे अटकेत

**संतोष पडवळ । ठाणे**

सध्या सुरू असलेला गणेशोत्सव तसेच अगामी ईद-ए-मिलाद इ. सण-उत्सव कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहुन कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत पार पडण्याच्या पार्श्वभुमीवर मा. पोलीस आयुक्त सो ठाणे शहर यांनी गुन्हे शाखेच्या पथकांना अवैध शस्त्र खरेदी विक्री करणाऱ्या, अंमली पदार्थाचा व्यापार करणाऱ्या तसेच इतर अवैध धंदे करणाऱ्या जास्तीत जास्त इसमां विरूध्द सक्त कारवाई करण्याबाबत सक्त आदेश दिले होते. सदर आदेशाची अंमलबजवणी करण्यांच्या व कारवाई करण्याच्या अनुषंगाने गुप्त माहिती मिळवीत असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांनी पहाटेच्या सुमरास इसम नामे आकाश व त्याचे दोन मित्र अक्षय व बिड्डु हे कल्याण स्टेशन परिसरात अग्नीशस्त्र व काडतुसे कोणाला तरी विक्री करण्याकरिता येणार आहेत असे समजले.



सदर मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक, सचिन कुंभार यांनी कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचला असता अक्षय नथनी सहानी, वय २० वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा.उत्तर दिल्ली, २) बिंदु धरमविरसिंग गौर, वय २६ वर्षे, रा.उत्तर प्रदेश, ३) आकाश दुर्गाप्रसाद वर्मा, वय २३ वर्षे, रा. सेंट्रल दिल्ली यांना ताब्यात घेऊन २ देशी बनावटीचे पिस्टल, २ देशी कट्टे, ८ जिवंत काडतुसे असा एकूण १,८२,५००/- रू. किमतीचा मुददेमाल अवैधरित्या विक्री करण्याचे इरादयाने बेकायदेशीररित्या विनापरवाना आपले कब्जात बाळगुन, ठाणे शहर यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयाचे हददीत घातक शस्त्रे बाळगण्यास मनाई असल्याबाबत काढलेल्या आदेशाचा भंग करीत असताना मिळुन आले आहेत. त्यांच्याविरूध्द महात्मा फुले चौक, पोलीस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना लागलीच अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीची कोर्टातुन पोलीस कोठडी रिमांड मिळाली आहे. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सुभाष तावडे, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा ठाणे शहर करीत आहे. सदरची कारवाई अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. विनय घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त शोध-२, गुन्हे शाखा, यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील वपोनि/शैलेश साळवी यांच्या टीमने केले आहे.

# वडार समाजाला घराच्या मालकी हक्कासाठी करमाळा तहसीलसमोर धरणे आंदोलन

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील वडार समाजातील कायमस्वरूपी वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना त्यांच्या राहत्या घराच्या जागेचे मालकी हक्क मिळावेत, या प्रमुख मागणीसाठी करमाळा तहसील समोर वडार पँथर संघटनेचे बेमुदत धरणे आंदोलन सुरू झाले आहे. सोलापूर जिल्हाध्यक्ष राजकुमार उर्फ बाबा धोत्रे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी या आंदोलनाची सुरुवात झाली.

या आंदोलनाला भाजप किसान मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अण्णासाहेब सुपनवर यांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला. यावेळी वडार पँथरचे तालुकाध्यक्ष सागर पवार, आबासाहेब सुरवसे, गुलाबराव गायकवाड, विलास ननवरे, महादेव सुरवशे, नागनाथ गायकवाड, लष्कर , शिवाजीराव बनकर, अनिल तेली, कैलास पवार आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष बाबा धोत्रे म्हणाले, जोपर्यंत वडार समाजाच्या घराची जागा त्यांच्या नावावर केली जात नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील. शासनाने तात्काळ दखल घेऊन करमाळा तालुक्यातील ११८ खेडी आणि करमाळा शहरातील वास्तव्यास असलेल्या सर्व वडार समाज बांधवांना राहत्या घराचा मालकी हक्क द्यावा. त्यांनी इशारा दिला की, शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास यापुढे आणखी तीव्र आंदोलन उभारले जाईल.समाजाच्या मूलभूत अधिकारांसाठी सुरू असलेल्या या लढ्याचे नेतृत्व वडार पँथर संघटना करत आहे.



# विक्रोळीतील बुद्ध विहारात विहार जागृती मंच आयोजित वर्षावास पर्वाचे ८ वे पुष्प संपन्न : नशामुक्त जीवनावर उपयुक्त मार्गदर्शन

**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी पार्क साईट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील तथागत बुद्ध विहारात विहार जागृती मंचाने आयोजित वर्षावास पर्वाचे आठवे पुष्प साजरे करण्यात आले. रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी साप्ताहिक वंदना सूत्रपठण कार्यक्रमात रवी गवई आणि परिवार यांच्या हस्ते तथागत भगवान बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची पुष्पपूजा व अगरबत्ती-मेणबत्ती प्रज्वलित करून वंदन करण्यात आले. त्यानंतर त्रिसरण आणि पंचशील घेण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य सुमित साळुंके यांनी कुशलतेने केले. विहारात त्रिसरण-पंचशील घेतल्यानंतर भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका मंजुळाताई साळुंके यांनी माता यशोधरा यांच्या त्यागमय जीवनावर आधारित थोर मनाची थोर विचारी यशोधरा........ती तृष्णा तिने आवरली हे भावपूर्ण गीत गायिले.कार्यक्रमात नशामुक्त जीवन जगण्याच्या गुरुकिल्लीवर विशेष भर देण्यात आला. राष्ट्रीय प्रशिक्षक तसेच कार्यकारी समिती सदस्य, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य प्रवक्ते बास्को डिसोझा यांनी नशामुक्त जीवन जगण्याची गुरुकिल्ली या विषयावर उस्फूर्तपणे सुरुवात केली. व्यसनाबाबत त्यांनी शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपयुक्त असे मार्गदर्शन केले. त्यानंतर विवेक साळवी यांनी नशामुक्त जीवन जगण्यासाठी मानसिकता याविषयावर उपयुक्त माहिती दिली. नशा छोडो....भारत जोडो आणि Say No to Drug.... Yes to Life या घोषणांनी सरांनी कार्यक्रमाची सांगता केली. शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपयुक्त असे मार्गदर्शनपर व्याख्यान दिल्याने उपस्थित उपासकांनी त्याचा लाभ घेतला.सर्वात शेवटी, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे बौद्धाचार्य सुमित साळुंके साहेब यांनी राष्ट्रीय प्रशिक्षक तसेच कार्यकारी समिती सदस्य नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य प्रवक्ते बास्को डिसोझा सर, विवेक साळवी सर यांचे आणि सर्व बौद्ध उपासक/उपासिका यांचे आभार मानले.सदर कार्यक्रमास विभागातील भारतीय बौद्ध महासभेचे सर्व केंद्रीय शिक्षक, शिक्षिका, बौद्धाचार्य, उपासक-उपासिका, बालक-बालिका, युवा-युवती, जेष्ठ नागरिक असे एकूण १७८ उपासक उपस्थित होते. त्यानंतर सरणत्तयं घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाचे छायाचित्रण विशाल कांबळे आणि प्रशिक इंगळे यांनी केले. हा कार्यक्रम बौद्ध परंपरेतील वर्षावास साधनेचा भाग असून, समाजजागृती आणि नशामुक्तीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.



# नेप्तीत भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील नेप्ती येथे मंडळ अधिकारी कार्यालय नेप्ती यांच्या वतीने व मा. उपविभागीय अधिकारी श्री. सुधीर पाटील व तहसीलदार श्री. संजय शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भटक्या-विमुक्त समाजातील लाभार्थ्यांना जातदाखले, उत्पन्न दाखले आदी विविध दाखल्यांचे गावातच वाटप करण्यात आले. शासनाच्या या उपक्रमामुळे लाभार्थ्यांना वेळ, खर्च आणि कार्यालयीन दगदग वाचल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



या कार्यक्रमास नेप्ती गावचे सरपंच संजय जपकर, नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक वसंत पवार, व्हाईस चेअरमन सादिक पवार, सोसायटीचे संचालक जालिंदर शिंदे, सुरेश कदम, महेंद्र चौगुले, भूषण पवार, सचिन पवार, शरद पवार, दत्तू थोरात, नितीन पवार, नेप्ती मंडळातील ग्राम महसूल अधिकारी विनायक दिक्षे, सुवर्णा रांधवण, दीपक झेंडे, श्रीकृष्ण निमसे, रूपाली म्हस्के, दीपाली विधाते, प्रसाद पवार, नैतिक पवार, रोहित गव्हाणे, विशाल चौगुले, रवी पवार, मानव पवार, सम्राट पवार, धनराज पवार, गणेश कर्पे, उपेंद्र कर्पे आदीसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे म्हणाले की, १८७१ साली ब्रिटिश सरकारने क्रिमिनल ट्रायब क्ट लागू करून भटक्या समाजावर अन्यायकारी कायदा लादला होता. मात्र, स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी शासनाने हा कायदा रद्द केला. त्यानंतर दरवर्षी ३१ ऑगस्ट हा भटके विमुक्त दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस समाजातील लोकांना त्यांच्या अधिकारांविषयी जागरूक करून देतो आणि सामाजिक न्यायाचा संदेश देतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी रामदास फुले म्हणाले की, भटके विमुक्त दिवस साजरा करणे हा एक प्रकारचा कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या समाजाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशासाठी मोठे योगदान दिले आहे. छत्रपती शिवरायांच्या काळातही या समाजाने स्वराज्यासाठी योगदान दिले. भटक्या विमुक्तांना विविध दाखले देण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी ना. अतुल सावे यांचे आभार मानले.दाखले मिळाल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. गावातच दाखले उपलब्ध करून दिल्यामुळे अनेकांनी महसूल प्रशासनाचे कौतुक केले. पूर्वी यासाठी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागे, परंतु आता गावातच सुविधा मिळाल्याने खऱ्या अर्थाने शासन आपल्या दारी हा संकल्प या उपक्रमातून साधला गेला.

## हरित महाराष्ट्र-समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत करमाळा बाजार समितीत वृक्षलागवडीचा शुभारंभ

**सोलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये हरित महाराष्ट्र - समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ बाजार समितीचे सभापती तथा माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना माजी आमदार जगताप म्हणाले की, राष्ट्रीय वननीतीनुसार देशातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्रावर वन व वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत राज्यात हे प्रमाण २१.२५ टक्के आहे. त्यामुळे वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी 'हरित महाराष्ट्र - समृद्ध महाराष्ट्र' हे अभियान लोकचळवळ म्हणून राबविण्याचा निर्णय राज्याचे मुख्यमंत्री यांनी घेतला आहे.राज्यातील बाजार समित्यांना महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने दिलेल्या उद्दिष्टानुसार व जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा बाजार समितीच्या आवारात सुमारे दीडशे वृक्षांची लागवड व सुशोभीकरण करण्यात आले.वृक्षलागवडीनंतर संगोपनाचे महत्त्व



अधोरेखित करताना जगताप यांनी आवाहन केले की, या मोहिमेत बाजार समितीतील आडते-व्यापारी, गाळेधारक, हमाल-तोलार तसेच कर्मचारी यांनी सहकार्य करावे.क ार्यक्रमाला विशेष लेखापरीक्षक सुनील काळे, संचालक जनार्धन नलवडे, मनोज पितळे, परेश दोशी, माजी संचालक मयूर दोशी, व्यापारी विक्रांत मंडलेचा, खरेदी-विक्री संघाचे संचालक बबनराव मेहेर, शहाजी शिंगटे, अमोल परदेशी, युसुफ शेख, दत्तात्रय भागडे, दिगंबर रासकर, वृक्षमित्र किरण दुरगुडे यांच्यासह शेतकरी, व्यापारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांचे आभार बाजार समितीचे सचिव विठ्ठल क्षिरसागर यांनी मानले

# आंबेडकरवादी विचार फक्त सांगुन चालणार नाही तर ते आचरणात आणावे लागतील-भारत सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

प्रतिनिधि मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषद महाराष्ट्र संविधान अमृत वर्षत सा.स.अण्णाभाऊ साठे व महाकवि वामन दादा कर्डक यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त राज्य स्तरावरील कविसंमेलनाचे उद्धघाटन करताना भारत सातपुते बोलताना म्हणाले कि येथील प्रचलित समाज व्यवस्थेने निर्माण केलेल्या समग्र समस्या आंबेडकरवादा आधारेच सुरु शकतात. लोकशाहीला मजबूत करण्यासाठी मानवी कल्याणार्थ दृष्टिकोनातुन संविधानात सकारात्मक संशोधन करुन अद्ययावत करावे लागेल.संविधानाची प्रभावी आंमलबजाणनी करताना योग्य लोकशाही पध्दतीतीचा अवलंब करावा लागेल.त्यासाठी आम्हाला फक्त सांगुन चालणार नाही तर तो आम्हाला आचरणात आणावा लागेल त्या शिवाय सामाजिक परिवर्तन प्रक्रिया पुर्णत्वास जाणार नाही.प्रमुख पाहूणे प्रा.डॉ.किर्तीकुमार मोरेसरांनी उपस्थित साहित्यिक, साहित्य रसिकांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले कि,आज भारतीय नागरिकांमध्ये संविधानिक व संविधान लोकशाही बाबतीत पाहिजे त्या प्रमाणात जागृती नसल्यामुळे नागरिक आपली योग्य भुमिका साकारीत नाहीत.म्हणून संविधानिक अधिकार-कर्तव्या प्रति नागरिकात सकारात्मक भावना रुजवावी लागेल. त्यासाठी साहित्यिकांनी मानवतावाद हे आंबेडकरी साहित्याचे प्राणतत्व आहे हे समजुन घेउन उपेक्षित वंचितांच्या वेदनांना उपाययोजणेसह शब्दात साकारावे आसे प्रतिपादन कले.या प्रसंगी नियोजित मानवतावाद पेलताना कविता-संग्रहाचे मान्यवरांच्या हास्ते व उपस्थितांच्या साक्षीने प्रकाशन करण्यात आले.मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषद महाराष्ट्र चे अध्यक्ष धी.चंद्रप्रकाश जी.शिंदे यांनी परिषदेचे प्रयोजन सांगुन साहित्यिकांनी स्वतःला बौध्दिक, वैचारिक, मानसिक दृष्ट्या अद्ययावत होऊन सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत सक्रिय होण्याचे अव्हाण केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष




छगन घोडके (उपाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.) हे अध्यक्षीय समरोप करताना वक्त्यांच्या वक्तव्याचा आडावा घेऊन साहित्यिक संघ शक्तीच संविधानास व लोकशाहीस फलद्रुप होण्यास सहाय्यभुत ठरेल.प्रस्तावित मुरलीधर रणखांब (जिल्हसचिव मा.प्र.सृ.सा.प.परभणी )यांनी प्रभावीपणे केले. सुत्रसंचालन धी.डॉ.हरिष रणबावळे (राज्य कार्यकारिणी सदस्य मा.प्र.सृ.सा.प.महा.)यांनी उत्कृष्ट पणे केले.या सत्राचे आभार धी.एम बी गोमुकले तालुका सचिव मा.प्र.सृ.सा.प.गंगाखेड यांनी केले. कविसंमेलनासाठी महाराष्ट्रातील आनेक ठीकाणाहुन आलेल्या प्रतिभासंपन्न प्रसिद्ध कविचा सहभाग झाला होता.अमरावतीचे धी.देविलाल रौराळे,सांगलीचे धी.सु[illegible]बळे,भावेश साबळै, काटे,पुण्याचे धी. सुनिल गायकवाड, हिंगोली चे बबन मोरे,प्रकाश भालेराव,शेख मनसब शाह,समाधान लोकर,धम्मानंद भगत,परभणीचे प्रा.यशवंत मकरंद, अहमदपुरच्या रंजना गायकवाड, बीडचे प्रा. संजय कांबळे,एडवोकेट काकासाहेब सोनवणे, परळीचे बा.सो.कांबळे,गंगाखेड चे डॉ.यशवंत मस्के,लक्ष्मण वावळे,प्रा.भगवान गायकवाड, पांडुरंग काळे , इ. प्रतिभासंपन्न प्रसिद्ध कविनी आपल्या कविता ,गेय कवितेतुन सभागृहाला डोलावले व उर्जात्मक उत्साहजनक वातावरणाची निर्मिती झाली.कविसंमेलनाचे अध्यक्ष धी.डी.जी.वाळवंटेनी (संघटक मा.प्र.सृ.सा.प.महा.) आपल्या अध्यक्षीय समरोप करताना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करुन दाद मिळवली.शेवटी तालुका अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.पं गंगाखेड यांनी सर्वाचे आभार मानुन वामनदादाच्या गीताने सांगता केली.

## उजनीत साकारतोय विकासाचा सेतू; कुगाव-इंदापूर जोडपूलाचे काम युद्धपातळीवर सुरू

**सोलापूर । प्रतिनिधी**

उजनी बॅकवॉटरमुळे तीनही बाजूंनी वेढलेल्या कुगाव (ता. करमाळा) गावाला अखेर इंदापूर शहराशी जोडणारा 'विकासाचा सेतू' साकारतो आहे. फक्त नऊ किलोमीटर हवाई अंतर असूनही आतापर्यंत शिक्षण, आरोग्य आणि बाजारपेठेसाठी गावकऱ्यांना तब्बल १०० किमीचा फेरा मारावा लागत होता. आता या पुलामुळे तो मोठा अडथळा दूर होणार आहे.



कुगाव हे नैसर्गिक सौंदर्याने नटलेले गाव असले तरी उजनीच्या बॅकवॉटरमुळे ते वर्षानुवर्षे अलगद राहिले. फक्त अंतराचाच नव्हे तर संधी व विकासाच्या अभावाचा प्रश्न गावासमोर उभा होता. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून कुगाव-इंदापूर जोडपूलाची मागणी अनेक वर्षे होत होती. या मागणीला गती दिली ती माजी सरपंच सौ. तेजस्विनी दयानंद कोकरे यांनी. शासन दरबारी पाठपुरावा करून त्यांनी या विषयाला चालना दिली. पुढे माजी आमदार व तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांनी निर्णायक पुढाकार घेतला. दरम्यान, अजितदादा पवार यांनी या पुलाच्या कामासाठी विधानसभेत ठोस पाऊल उचलले. त्यांच्या प्रयत्नांमुळे पुलासाठी तब्बल ३९६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आणि शासनाने प्रकल्पाला हिरवा कंदील दाखवला. शासन मान्यता मिळाल्यानंतर २३ ऑगस्ट २०२४ रोजी प्रत्यक्ष बांधकामाची सुरुवात झाली असून, सध्या काम युद्धपातळीवर सुरू आहे. या पुलामुळे कुगावसह आसपासच्या गावांचा प्रवास सुलभ होईल. शेती व्यवहारांना गती मिळेल, आरोग्य व शिक्षणाची उपलब्धता सोपी होईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक विकासाला नवे दालन उघडेल. हा पूल फक्त कुगाव-इंदापूर जोडणारा दुवा नाही, तर संपूर्ण प्रदेशाला विकासाच्या मार्गावर नेणारा खरा सेतू ठरणार आहे.

## वैजापूरमध्ये जैन श्रावक संघाचा सिध्दी तप सन्मान सोहळा उपवास तपस्वींना शहरातून भव्य शोभायात्रेत सन्मान

**वैजापूर । प्रतिनिधी**

श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ वैजापूरतर्फे उपवास सिध्दीतम तपस्वी यांचा रविवारी (दि.३१) शहरातून भव्य शोभायात्रा काढून सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र प्रवर्ती डॉ. पू. श्री ज्ञानप्रभाजी म.सा., सुशिष्या तपस्वीरत्न पू. श्री पुष्पचुलाजी म.सा., व पू. श्री सुप्रियदर्शनाजी म.सा. ठाणा ५ यांच्या सानिध्यात ४५ अराधकांनी सिध्दीतप पूर्ण केलेल्या उपवास तपस्वींना पहाटे आठ वाजता पंचायत समितीपासून शोभायात्रेत सामील केले गेले.

शोभायात्रा टिळक रोड मार्गे शहरात फेरफटका मारून स्व. बन्सीलाल रुपचंद संचेती जैन स्थानकात पोहोचली. स्थानकावर सिध्दीतप सन्मान सोहळा पार पडला, त्यानंतर प्रसाद वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



सिध्दीतप सन्मान समारोहात जैन साध्वींसह माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, शिल्पाताई परदेशी, मर्चेंट बँकेचे चेअरमन बाळासाहेब संचेती, मेजर सुभाष संचेती, प्रकाशसेठ बोथरा, विशाल संचेती, अमृतलाल बोथरा, राजेंद्र संचेती, प्रफुल्ल संचेती, सुरेंद्र संचेती, पारसमल संचेती, निलेश पारख, राजेंद्र पारख, दिपक संचेती, रुपेश संचेती, गौतम संचेती, महावीरसेठ बाफणा, आनंद संचेती, अनिल धरमचंद संचेती, मनोज संचेती, प्रा. जवाहर कोठारी, नंदलाल मुगदिया, शांतीलाल संचेती, आनंदीलाल बोथरा, महेश पारख आदींबरोबर जैन समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाने उपवास तपस्वींना सन्मान देत जैन समाजात धार्मिक व सामाजिक एकतेची प्रतिमा अधोरेखित केली आहे.

## माजी सभापती अविनाश घुले यांचा तातडीने तोडगा;प्रभागात कचरा साफसफाई मोहिम सुरु

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

प्रभाग क्र. ११ मध्ये गेल्या अनेक दिवसांपासून कचर्याची घंटागाडी न आल्याने परिसरात सर्वत्र कचर्याचे ढीग साचले होते. नागरिकांच्या घरातही ओला व सुका कचरा जमा झाल्याने दुर्गंधी पसरून आजारांचा धोका निर्माण झाला होता. या गंभीर समस्येबाबत नागरिकांनी माजी सभापती अविनाश घुले यांच्याकडे तक्रार केली. नागरिकांच्या विनंतीवर तातडीने प्रतिसाद देत घुले यांनी आरोग्य विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर लगेच जेसीबी व ट्रॅक्टर पाठवून कचरा साफसफाईची मोहीम राबविण्यात आली. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला.



यावेळी घुले यांनी आणखी एका समस्येवर लक्ष वेधले. परिसरातील रस्त्याच्याबाबत मधोमध उभे असलेले विद्युत खांब काढण्याची मागणी नागरिकांकडून अनेकदा केली असूनही महावितरण विभागाने दखल घेतलेली नाही. या प्रकरणी महावितरण अधिकारी, महापालिका अधिकारी व विद्युत विभागातील कर्मचारी यांनी तातडीने कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा घुले यांनी दिला.

यावेळी किरण कटारिया, प्रिति डाके, सुनिल डाके, राजकुमार कांबळे, ललित कांबळे, देविदास कांबळे, सॅमविल बनसोडे, अमोल सरोदे, दिपाली कांबळे, कांताबाई कांबळे, द्रोपदा पाटोळे, संगिता सरोदे, इंदूबाई कांबळे, अनिता कांबळे, प्रभाकर डाके, श्रुती लोखंडे, रेखा अडागळे, ज्योती गायकवाड, सारीका अडागळे आदी महिला उपस्थित होत्या. माजी सभापती अविनाश घुले म्हणाले की, मनपा प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींना वेळेवर प्रतिसाद देणे गरजेचे आहे. कचर्याच्या समस्येमुळे परिसरात दुर्गंधी पसरून आजारांचा धोका निर्माण झाला होता. नागरिकांना त्यांच्या आरोग्याबाबत अनावश्यक त्रास होऊ नये यासाठी आम्ही तातडीने आरोग्य विभागाशी संपर्क साधून साफसफाईची व्यवस्था केली. पण ही जबाबदारी प्रत्यक्षात प्रशासनाने सातत्याने पार पाडली पाहिजे. ते पुढे म्हणाले की, प्रभागातील रस्त्याच्या कामाचा प्रारंभ करण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून मधोमध असलेले विद्युत खांब रस्त्याच्या कामात अडथळा ठरत आहे. या प्रश्नाकडे वारंवार लक्ष वेधूनही महावितरण विभागाने तो सोडवलेला नाही. त्यामुळे महावितरण अधिकारी व महापालिका प्रशासनाने तातडीने कारवाई करावी. अन्यथा नागरिकांसोबत आम्हाला आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल. प्रशासनाने नियोजनबद्ध पद्धतीने काम केले, तर आंदोलने करण्याची वेळच येणार नाही.

## जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पै. विराज बोडखे याने पटकाविले सुवर्णपदक



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय व महापालिका क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पै. विराज बाबासाहेब बोडखे याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन १७ वर्षाखालील गटात सुवर्णपदक पटकाविले. त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नुकतेच शहरातील भिस्तबाग, पवन नगर येथील छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्र येथे जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा पार पडली. यामध्ये महापालिका हद्दीतील विविध शाळांतील ११५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. पै. विराज बोडखे याने चितपट कुस्ती करुन विजेतेपद पटकाविले आहे. त्याची पुणे विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये पुणे, सोलापूर व नगर या जिल्ह्यातील विजयी झालेल्या खेळाडूंमध्ये सामने होणार आहेत. यामधील विजयी खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.पै. विराज बोडखे हा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक तथा शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांचा लहान मुलगा आहे. तो भिस्तबाग येथील छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्रात पै. शिवाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वस्ताद पै. संदीप गायकवाड, पै. नितीन आव्हाड, पै. आतीष ठाकूर, पै. शंभू यादव यांच्याकडे कुस्तीचे धडे घेत आहेत. तो सावेडी येथील आनंद विद्यालयात इयत्ता दहावी मध्ये शिकत आहे. या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप व गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्यासह आनंद विद्यालयाचे मुख्याध्यापक व शालेय शिक्षक, शिक्षकेतरांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## दादाराव चौरे यांचे दुखःद निधन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील ज्येष्ठ व शतायुषी व्यक्तिमत्त्व स्व.दादाराव नामदेव चौरे वय १०५ वर्षे यांचे वृद्धापकाळाने मंगळवार दि.२ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता दुःखद निधन झाले.त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



स्व.दादाराव चौरे हे अत्यंत कष्टाळू, मनमिळावू व थोर व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात. शेतकरी कुटुंबात जन्मलेले दादाराव यांनी आयुष्यभर शेतीवर प्रेम केले. दीर्घायुष्य लाभलेल्या चौरे यांनी आपल्या कर्तृत्वातून कुटुंबासोबत समाजात ही एक आदर्श निर्माण केला होता.त्यांच्या निधनाने जीवाचीवाडी व परिसरात शोककळा पसरली आहे.वयोवृद्ध असूनही त्यांची साधी, सरळ जीवनशैली व लोकांशी वागणारा जिव्हाळा यामुळे त्यांचा मोठा स्नेही वर्ग तयार झाला होता.

त्यांच्यावर अंत्यसंस्कार बुधवारी दि.३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता त्यांच्या शेतात, काळांबा येथे होणार आहे.त्यांच्या पश्चात तीन मुले,एक मुलगी, सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. कुटुंबातील ज्येष्ठ आधारस्तंभ हरपल्याने परिसरात शोक व्यक्त होत आहे.

## अंबाजोगाईत दुर्दैवी अपघात

## बसमधून उतरताना पदर अडकून महिलेचा मृत्यू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरालगत मोरेवाडी परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. विजयमाला सरवदे (वय ५७, रा. केज) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होत्या. घटनेची माहिती अशी की, विजयमाला सरवदे नोकरीच्या निमित्ताने दररोज केजहुन अंबाजोगाईला ये-जा करत असत. आज सकाळी देखील त्या अंबाजोगाईला येण्यासाठी धारूरहून परळीच्या दिशेने निघालेल्या बसमध्ये (एमएच १४ एमएच २३४७) बसल्या. या बसने अंबाजोगाई येथे थांबा घेतल्यावर विजयमाला सरवदे या उतरू लागल्या. त्यावेळी त्यांच्या साडीचा पदर बसमध्ये अडकला आणि त्या खाली कोसळल्या. इतक्यात बस पुढे निघाली आणि त्यांच्या दोन्ही पायांवरून चाक गेले. निघाली आणि त्यांच्या दोन्ही पायांवरून चाक गेले.त्यांना तत्काळ त्यांना गंभीर जखमी अवस्थेत स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, मात्र उपचारा पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.



या घटनेमुळे रुग्णालयात शोककळा पसरली असून सहकारी कर्मचारी आणि स्थानिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. पुढील तपास अंबाजोगाई पोलीस करत आहेत.

## आमदार अमित गोरखे यांच्याकडून स्टार २४ न्यूजचे कौतुक,युवा पत्रकार दत्तात्रय मजमुले यांनी साकारला जीवनपट



**केज । प्रतिनिधी**

विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा जीवनपट स्टार २४ न्यूजचे युवापत्रकार व संपादक दत्तात्रय मुजमुले यांनी शब्दबद्ध केला आहे.बीड जिल्हा दौऱ्यादरम्यान आमदार गोरखे यांची भेट घेऊन स्टार २४ न्यूजची डिजिटल आवृत्ती त्यांना भेट देण्यात आली. या प्रसंगी आमदार अमित गोरखे यांनी स्टार २४ न्यूजच्या कार्याचे विशेष कौतुक करत पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.युवा पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्या लेखणी तून साकारलेला हा जीवनपट आमदारांच्या कार्याचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरेल,अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.यावेळी भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077